मराठीच्या मानगुटीवर संस्कृतची वेलांटी

अशोक राणा

- जिजाई प्रकाशन -

- जिजाई प्रकाशन क्रमांक : २०९
- मराठीच्या मानगुटीवर
संस्कृतची वेलांटी --अशोक राणा
MARATHICHYA MANGUTIWAREEL
SANSKRUTCHEE VELANTEE - ASHOK RANA
Mob.-9325514277
e mail-ashok.rana123@gmail.com
- © सर्व हक्क सुरक्षित
- प्रकाशन
१२ जानेवारी २०१४
- अक्षरजुळणी व मुखपृष्ठ
शिव एन्टरप्रायजेस, पुणे.
- प्रकाशक व मुद्रक
जिजाई प्रकाशन,
५८४, नारायण पेठ, कन्या शाळा बसस्टॉप,
जिजापूर (पुणे) ४११०३०.
फोन नं. : ०२०-२४४७६५३९
www.jijaiprakashan.com
- पृष्ठसंख्या – ३२
- सेवामूल्य : १५ रूपये

विनंती : कृपया एकमेकांना ग्रंथ–पुस्तकेच भेटस्वरूपात द्या.

(ग्रंथातील विचार लेखकाचे आहेत, प्रकाशक व मुद्रक त्यास सहमत असतीलच असे नाही. पुणे न्यायालयीन कक्षेत.)

मराठीच्या मानगुटीवर संस्कृतची वेलांटी
– एक भाषिक समस्या

प्रस्तावना

आज सगळीकडे आपणास मराठीच्या अस्तित्वाची चिंता करणारी मंडळी दिसत आहेत. इंग्रजीच्या आक्रमणामुळे मराठीची गळचेपी होत आहे, अशी हाकाटी पिटविणारी भाषणे देणारे वक्ते आणि लेख लिहिणारे लेखक मराठीच्या भवितव्याबद्दल अतिशय व्याकुळ झालेले आहेत असे दृश्य प्रसारमाध्यमांनी निर्माण केलेले आहे. अशा प्रकारचे विचार मांडणारे मराठी भाषेचे कैवारी जी चिंता वाहतात ती मराठीच्या प्रमाणभाषेची. व्यवहारातून मराठी भाषा जाऊन बोली म्हणून ती शिल्लक राहील आणि तीही कालांतराने नष्ट होईल,[१] असे त्यांच्या चिंतेचे स्वरूप असते. या चिंतेमध्ये प्राधान्य आहे ते प्रमाणभाषेला. बोलीच्या रूपात ती शिल्लक राहील या वास्तवाचा स्वीकार मात्र ते करतात. भारत हा खेड्यांचा म्हणजे अधिक खेडे असलेला देश आहे. खेड्यांमध्ये बोलीच संप्रेषणाची गरज भागवितात. त्यामुळे त्यांना मरण नाही. मरणाची भीती आहे ती प्रमाणभाषेला. इंग्रजीच्या आक्रमणाखेरीज सुद्धा तिचे मरण अटळ आहे ते शुद्धलेखनाच्या नियमांमुळे. म्हणून ज्यांना-ज्यांना मराठी जगावी असे वाटत असेल त्यांनी-त्यांनी या नियमांकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे.

शुद्ध नव्हे, प्रमाणलेखन!

दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनी मराठीचे व्याकरण लिहिण्यामागे 'शुद्ध कसे बोलावे व शुद्ध कसे लिहावे' हे कारण सांगितले होते. त्यामुळे मराठीच्या व्याकरणात शुद्धाशुद्धतेचा बडिवार माजला. आज भाषावैज्ञानिक संशोधनाने भाषेच्या शुद्धाशुद्धतेच्या कल्पनेला अवैज्ञानिक ठरविले. त्यामुळे नव्या सांस्कृतिक धोरणात शुद्धलेखन या शब्दाऐवजी प्रमाणलेखन हा शब्द वापरण्याचा निर्णय झाला. यापुढे मराठीच्या प्रमाणलेखनाविषयीच्या शासकीय प्रकाशनात तो वापरला जाईल. त्यामुळे इतरांना सुद्धा तोच वापरणे आवश्यक राहील; परंतु यापूर्वी प्रकाशित पुस्तिकांमध्ये असल्यामुळे याठिकाणी तो वापरीत आहे.

शुद्धलेखन नियमावली

महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने १९६६ मध्ये प्रशासनिक लेखन आणि १९८१ मध्ये कार्यदर्शिका या पुस्तकांमध्ये शुद्धलेखनाचे नियम समाविष्ट केले होते.

१९७२ मध्ये मराठी साहित्य महामंडळाने 'लेखनविषयक नियम' या शीर्षकाखाली एक पुस्तिका प्रकाशित केली होती. तिच्या आणि मो. रा. वाळंबे यांच्या व्याकरणविषयक साहित्याच्या आधारे १९८७ मध्ये शुद्धलेखन नियमावली भाषा संचालनालयाने प्रकाशित केली. या पुस्तिकेत "अनुस्वार, ऱ्हस्व व दीर्घ यांच्या व्यवस्थेलाच स्थूलमानाने शुद्धलेखन हा शब्द योजला जातो." असे म्हटले आहे.

रा. भि. गुंजीकरांनी अनुच्चारित अनुस्वार लिहू नये हा विचार प्रथम मांडला आणि टिळक चरित्राच्या दुसऱ्या व तिसऱ्या खंडातून अनुच्चारित अनुस्वार न. चिं. केळकर यांनी वगळले.[२] त्यानंतर बेळगाव येथे १९२९ मध्ये झालेल्या साहित्य संमेलनाने शुद्धलेखन मंडळ स्थापून नवे नियम तयार केलेत. त्यांना गोवा येथे झालेल्या साहित्य संमेलनात मान्यता मिळाली; परंतु त्याची अंमलबजावणी काटेकोरपणे न झाल्यामुळे विदर्भ साहित्य संघाने सुधारित नियमांचा आराखडा तयार केला. त्याला महाराष्ट्र साहित्य परिषदेचीही मान्यता मिळाली.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर १९६० मध्ये मराठीला राजभाषेचा दर्जा देण्यात आला. त्यामुळे मराठीकरण ही एक आवश्यक बाब झाली. त्यासाठी नेमलेल्या भाषा सल्लागार मंडळाने शुद्धलेखनाच्या नियमांचा नवा आराखडा तयार केला. त्यात आवश्यक तो बदल करून मराठी साहित्य महामंडळाने या नियमांना मान्यता दिली. राज्यशासनाने या नियमावलीची अंमलबजावणी राज्यकारभारात आणि शिक्षणाच्या सर्व क्षेत्रात करण्याचे ठरविले. या नियमावलीचे वैशिष्ट्य 'उच्चारानुसार लेखन' हे आहे, असे मानले जाते; परंतु त्यात कितपत तथ्य आहे याचा विचार करावयास हवा. त्याचप्रमाणे अनुच्चारित अनुस्वार न लिहिण्याचा निर्णय जसा घेतला गेला तसाच उच्चारानुसारी लेखन न होणाऱ्या शब्दामधील ऱ्हस्व-दीर्घविषयी विचार करायला मराठी साहित्य महामंडळ अथवा शासकीय विद्वान का तयार नाहीत याचाही शोध घेतला पाहिजे. त्यासाठी पहिल्यांदा या नियमांचे स्वरूप समजून घेऊया.

ऱ्हस्व-दीर्घ नियमांचे स्वरूप

शुद्धलेखन नियमावलीमध्ये नियम ५ ते ११ हे ऱ्हस्व-दीर्घविषयक आहेत. त्यापैकी पाचव्या नियमात प्रारंभीच म्हटले आहे की, "मराठीतील तत्सम इकारान्त आणि उकारान्त शब्द दीर्घान्त लिहावे. उदा. कवी, मती, गती, गुरू. इतर शब्दांच्या अंती येणारा इकार व उकार दीर्घ लिहावा. उदा. पाटी, जादू, पैलू, विनंती ही (शब्दयोगी अव्यय) अपवाद – आणि, नि."

यानंतर वरील नियमांचे स्पष्टीकरण देताना, "परंतु, यथामति, तथापि, इत्यादी तत्सम

अव्यये ऱ्हस्वान्त लिहावी. तसेच सामासिक शब्दातही तत्सम (ऱ्हस्व) इकारान्त व उकारान्त शब्द पूर्वपद असताना ऱ्हस्वान्तच लिहावे. उदा. बुद्धिवैभव, कविमन, गतिशील.'' अशी माहिती दिलेली आहे.

यावरून तत्सम म्हणजेच संस्कृत शब्द मराठीत दीर्घान्त होतात हे दिसून येते. पुढील स्पष्टीकरणात लेखनविषयक नियम काटेकोरपणे पाळले जात नसल्याची तक्रार केलेली आहे. अव्ययांच्या बाबतीत मात्र वेगळे स्पष्टीकरण दिलेले आहे. सामासिक शब्दाच्या बाबतीतही उच्चारानुसारी लेखनाचा संकेत पाळण्याची सूचना केलेली आहे. मराठी भाषेची प्रकृती दीर्घान्त असल्यामुळे तत्सम शब्द दीर्घान्त लिहिण्याची सूचना करणारा हा नियम 'आणि' व 'नि' या अव्ययांना मात्र अपवाद ठरवितो. मराठी भाषेतील ही अव्यये ऱ्हस्वान्त लिहिण्याचे कारण मात्र स्पष्टीकरणात आलेले नाही. मूळ संस्कृतमधून आलेली 'परंतु, यथास्थिति, तथापि, अद्यापि, इति, प्रभृति, कदापि' यासारखी अव्यये ऱ्हस्वान्तच लिहावी असे हा नियम सांगतो. अर्थात मराठी व तत्सम असा फरक याठिकाणी केलेला नाही.

सामासिक शब्द लिहिताना समासाचे पूर्वपद तत्सम ऱ्हस्वान्त असेल तर ते ऱ्हस्वान्तच लिहायचे हा नियम सांगताना 'बुद्धिचातुर्य' 'बुद्धिवैभव' या शब्दांची उदाहरणे स्पष्टीकरणात दिलेली आहेत. निवृत्तिवेतन, विधिनिषेध, वस्तुस्थिती, कृतिसमिती, स्थितिशील, प्राप्तिकर इ. उदाहरणे देऊन षष्ट्यब्दीपूर्ती, शताब्दी समारोह, वधूवर या सामासिक शब्दांमध्ये सामासिक शब्द तत्सम असूनही दीर्घान्त राहतील असे या नियमाच्या स्पष्टीकरणात म्हटलेले आहे.

सहाव्या नियमामध्ये ईकारान्त व ऊकारान्त शब्दातील उपान्त्य इकार व उकार ऱ्हस्व लिहावेत असे सांगून गरिबी, माहिती, हुतुतू, सुरू ही उदाहरणे दिलेली आहेत. नीती, भीती, रीती, कीर्ती इ. तत्सम शब्द दीर्घान्त लिहिण्याचा अपवाद पुढे सांगितला आहे. ते संस्कृतात दीर्घान्त असल्यामुळे तसे करावे असे स्पष्टीकरण पुढे दिलेले आहे.

उपान्त्य स्वराविषयी माहिती देताना उकारान्त शब्दाची माहिती दिली तशीच अकारान्त, एकारान्त आणि ओकारान्त शब्दांचीही दिली आहेत. तत्सम शब्दांना मात्र हा नियम लागू नाही असे स्पष्टीकरण पुढे दिले आहे. उदा. खिळा, सुळा, पाहिले, मिळवतो इ. शब्दांप्रमाणे ऊर्जा, ऊष्मा, पूजा, परीक्षा, प्रतीक्षा इ. शब्द ऱ्हस्व उपान्त्य करू नये. याविषयी पुढे म्हटले आहे की, ''यावरून असे म्हणता येईल की, मराठीमध्ये शब्दातील शेवटचे अक्षर दीर्घ असेल तर त्याचा उपान्त्य (म्हणजेच शेवटच्या अक्षराच्या अलीकडचा) इकार व उकार ऱ्हस्व असतो. मात्र, तत्सम शब्दांना हा नियम लागू नाही.''

या नियमांप्रमाणेच यानंतरच्या नियमांमध्येही मराठी तत्सम म्हणजेच संस्कृत

शब्दांच्या बाबतीत वेगवेगळे नियम आहेत हे आपल्या लक्षात येते. संस्कृत शब्दांना तत्सम म्हटले जाते तर संस्कृतमधून तयार झालेले शब्द तद्भव म्हणून मानले जातात. मराठीच्या व्याकरणात या दोन संज्ञांनी खूपच धुमाकूळ घातलेला आहे. ऱ्हस्व-दीर्घविषयक नियमांमध्ये तर त्यांची दहशत दखल घेण्यासारखी आहे. म्हणून त्याविषयी थोडक्यात वर्णन करूया.

तत्सम व तद्भवची भानगड

शुद्धलेखनाच्या ऱ्हस्व-दीर्घविषयक नियमांमध्ये अधिकाधिक वापरलेले हे दोन शब्द अध्यापकांच्या दृष्टीने एक गूढच आहेत. कोणते शब्द तत्सम व तद्भव आहेत हे ओळखणे हे त्यांच्यापुढे नेहमीच आव्हानात्मक असते. नामांचे वर्गीकरण म्हणून या शब्दांचा वापर केला जातो. संस्कृतमधून मराठीत आलेले ते तत्सम आणि संस्कृतमधून निर्माण झालेले ते तद्भव शब्द होत. वास्तविक मराठीत रुळल्यावर त्यांची अशी वेगळी ओळख कायम ठेवणे हे आवश्यक नाही. समाजातील चातुर्वर्ण्य व्यवस्थेप्रमाणे चातुर्वर्ण्याचे जातीत रूपांतर झाल्यावरही ब्राह्मणांनी आपले वर्ण म्हणून उच्चस्थान कायम ठेवण्यासारखे ते आहे. त्यांच्या या विशेष स्थानामुळेच ते खिचडीतील खड्यांप्रमाणे तोंडात अडकतात. परिणामी मराठीचे अध्यापक या शब्दांवरच अडखळतात. कारण त्यांना संस्कृतची व्याकरण व्यवस्था माहीत नसते. तसेच त्यांच्याकडून तशी अपेक्षा करणे ही चुकीचे असते. परंपरानिष्ठ अध्यापक ती करतात. त्याचप्रमाणे तद्भव-तत्समचे अवास्तव स्तोमही वाढवितात. मराठीच्या विकासातील हा सर्वात मोठा अडसर आहे. तो निर्माण होण्यामागील ऐतिहासिक वास्तव तसेच मानसिकता याविषयीचे संदर्भ आता थोडक्यात पाहूया.

मराठीत संस्कृत शब्द कसे व का?

अव्वल इंग्रजी कालखंडात शिक्षणाचे केंद्र पुणे होते. शाळा खात्यात वापरण्यायोग्य मराठीचे व्याकरण तसेच पुस्तके पुणे व मुंबई येथे निर्माण झालीत. मुंबई हे संमिश्र भाषिक शहर असल्यामुळे पुण्याला भाषेला या पुस्तकांमध्ये वापरण्याचे सरकारने ठरविले. याविषयी सुहासिनी लद्दू[३] म्हणतात, "शिक्षणावरच ब्राह्मण जातीचा उदरभरणाचा प्रपंच बराचसा आधारलेला असल्याने व शिवाय 'शिकणे' या क्रियेसाठी कष्ट घेण्याची या वर्गाला शारीरिक सवंय असल्याने शाळाखाते चालू होताच त्याचा फायदा ब्राह्मणवर्गाने अधिक घेतला. हे ब्राह्मण लोक इंग्रजी व संस्कृत जाणणारे असल्याने व त्यांना परंपराप्राप्त मराठी लेखन वाचनाची सवय असल्याने त्यांनी आपल्याला मान्य अशा मराठीचे स्वरूप व्याकरणात विवरण केले. ब्राह्मण लोकांना जुन्या मराठी वाचनाचा संपर्क असल्याने परंपराप्राप्त लिखित मराठी, संस्कृत भाषेच्या मदतीने जोपासून त्यांनी वाढविली. तिलाच

कालांतराने 'ब्राह्मणी मराठी' या संज्ञेने कधी सत्यदर्शक वृत्तीने तर कधी तिरस्काराने संबोधले जाऊ लागले."

शाळाखात्याच्या स्थापनेबरोबर जी मराठी 'प्रमाण' स्वरूपाने वावरू लागली ती बहुशः ब्राह्मणवर्गाकडून लिहिली गेल्याने व ब्राह्मण वर्गाचा संस्कृतशी परिचय असल्याने संस्कृतातील शब्दांची उचल करून ती समृद्ध झाल्याने पुढील काळात 'मराठीतील संस्कृत' हा प्रदीर्घ चर्चेचा विषय होऊन बसला. मराठीमधील संस्कृतच्या वापरावर टीका करणाऱ्या मंडळीकडून 'संस्कृतचे व्याकरण' या विषयाबरोबरच समाजजीवनाशी निगडित 'ब्राह्मण-ब्राह्मणेतर' वाद भाषेमध्ये शिरला. यामधून मराठीचे संस्कृतशी नाते किंवा संस्कृत भाषेच्या निकषांवर मराठीच्या व्याकरणासंबंधीचे निर्णय घेणे याचा अर्थ 'परंपरावादी' बनणे असा होऊ लागला. मराठी संस्कृत नातेसंबंधाच्या सुस्पष्ट रेषा आजही ठरल्या जाऊ शकत नाहीत. यावरून मराठीच्या व्याकरण काळापासून आजपर्यंत अस्तित्वात असणाऱ्या वादाचे स्वरूप लक्षात येईल.

या अवतरणातून मराठीमधील संस्कृत ही केवळ भाषिक समस्या नसून तिचे स्वरूप सामाजिकसुद्धा आहे हे दिसून येते. या समस्येमुळे बहुजन समाजातील विद्यार्थी, शिक्षक, पालक तसेच इतर वर्गांमध्येही भाषिक न्युनगंड निर्माण झालेला आहे. डॉ. ना. गो. कालेलकरांनी प्राथमिक शिक्षणातील बहुजन विद्यार्थ्यांच्या गळतीमागील कारणही हेच सांगितले आहे.[४] एक शैक्षणिक समस्या म्हणूनही या व्याकरणाकडे पाहणे आवश्यक होते; परंतु याविषयी कमालीची बेफिकिरी आजवर दाखविली गेली. त्यामागे कारण हे की, संस्कृताभिमानी लोकांचे अभिनिवेशी वर्तन, याप्रमाणे संस्कृतमधूनच सर्व भाषा तसेच मराठीची निर्मिती झाली असा अपसमज कारणीभूत आहे. त्यामुळे या अपसमजाचा परामर्श होणे आवश्यक ठरते.

संस्कृतचे मराठीशी नाते कोणते?

संस्कृत ही मुळात भारतीय भाषा नसून तिचे मूळ युरोपात असावे असे अभ्यासक मानतात. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ती पूर्वयुरोपातील लहानशा प्रदेशात उगम पावलेली भाषा होती असे मानीत असत. आजचे विद्वान तिला मध्य युरोपातील मानतात. इ.स.पूर्व अडीच तीन हजार वर्षांपूर्वी तेथून इराणमध्ये संस्कृत भाषिक लोक स्थिरावले. इ.स.पू. १५०० च्या आसपास ते भारतात आले. त्यामुळे संस्कृत व इराणी लोकांची अवेस्ता या भाषांमध्ये साधर्म्य असल्याचे डॉ. म. अ. मेंहेदळे[५] यांनी म्हटले आहे. अवेस्ता आणि संस्कृतमधील साम्याविषयी ना. गो. कालेलकर[६] म्हणतात की, "शब्दसंपदा, लेखनपद्धती आणि वर्णोच्चार या बाबतीतही या दोन भाषांमध्ये कमालीचे साम्य आहे." भारतात

इराणमधून आलेल्या आर्यांनी आपल्या संस्कृतीचे ज्ञान इतरांना होऊ नये या हेतूने एतद्देशियांना म्हणजे मूळ भारतीय लोकांना संस्कृत शिकण्यास मज्जाव केला. त्यामुळे ती मृतभाषा झाली. अशा मृतभाषेतून एखादी भाषा जन्माला आली असे म्हणणे हास्यास्पद आहे; परंतु आजही तसे म्हणणारे आपणास दिसून येतात. त्यांच्या या म्हणण्यातून त्यांचे भाषाविषयक अज्ञान स्पष्ट होते. हे सर्वसामान्यांप्रमाणेच स्वतःला विद्वान म्हणविणारांच्या बाबतीत घडताना आपण पाहतो.

ऋग्वैदिक आर्य भारतात येण्यापूर्वी भारतात प्राकृत भाषा अस्तित्वात होत्या, हे इतिहासाचार्य राजवाडे यांच्याप्रमाणे स्टेन कौनो, ज्ञुल ब्लोक, पिशेल इ. विद्वानांनी मान्य केले आहे. ॲड. प्र. रा. देशमुख[७] यांनी अनेक उदाहरणांसह हे पटवून दिलेले आहे. अशा काही प्राकृत भाषांपैकी महाराष्ट्री, अपभ्रंश, पैशाची, अर्धमागधी, पाली इ. च्या प्रभावातून मराठीची निर्मिती झाली. मराठीचे मूळ हा स्वतंत्रपणे अभ्यासाचा विषय आहे. त्यामुळे याठिकाणी अधिक तपशिलात जाता येणार नाही. मराठीच्या निर्मितीत प्राकृत भाषांचे योगदान अधोरेखित करून संस्कृतचा शब्दसंभार मराठीत येण्यामागील कारणे आपणास कळावीत एवढाच उद्देश या विवेचनामागे आहे. मराठीच्या प्रारंभकाळी ही संस्कृतमधील शब्द तसेच काही वर्ण मराठी भाषेत स्थिरावले होते. त्यामुळे त्या त्या काळी गरजेनुसार संस्कृत शब्दांची उचल विद्वानांनी केली होती हे दिसून येते. यावरून संस्कृतचे मराठीशी असलेले नाते उसनवारीचे होते हे स्पष्ट होते. ती उसनवारी फेडून म्हणजे मराठीतील संस्कृत शब्द तिला परत करून आपण मराठीला संस्कृतच्या दास्यातून मुक्त करू शकतो. त्यादृष्टीने तथाकथित शुद्धलेखनाच्या ऱ्हस्व-दीर्घविषयक नियमांकडे आपण पाहिले पाहिजे. हे नियम म्हणजे भाषेच्या क्षेत्रातील दहशतवाद आहेत. दहशतीखाली कुणाचाही विकास होत नाही. मग मराठी भाषेचा विकास कसा होणार?

भाषिक दहशतवादाचे वैज्ञानिक विश्लेषण

मराठी भाषेच्या व्याकरणात संस्कृतने जो दहशतवाद निर्माण केला आहे, त्याचे वैज्ञानिक विश्लेषण सामाजिक भाषाविज्ञान या आजच्या प्रगत भाषावैज्ञानिक शाखेने केलेले आहे. बॅझिल बर्नस्टाइन या ब्रिटिश समाजवैज्ञानिकाने मांडलेल्या विचारावर आधारित न्यून सिद्धांता (Deficit Hypothesis) ने भाषेमधील परिवर्तनामागील ऐतिहासिकता पुढे आणली. सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांमध्ये न्यूनगंड निर्माण होण्यामागील कारणेही या सिद्धांताने स्पष्ट केलीत. त्यांच्याकरिता विशेष शैक्षणिक अभ्यासक्रम केनेडी व जॉन्सन राष्ट्राध्यक्ष असताना अमेरिकेत राबविले गेलेत. भारतीय समाजव्यवस्थेला हा सिद्धांत कसा लागू होतो हे सांगताना मिलिंद मालशे म्हणतात[८]—

"भारतीय समाजव्यवस्थेमध्ये आर्थिक वर्गभेद किंवा शिक्षणातील भेद यापेक्षाही वर्ण वा जातींच्यानुसार झालेले भेद अजूनही ठळकपणे डोळ्यात भरतात. वर्ण वा जाती या (आजतरी) जन्मावरूनच ठरतात व त्यामुळे या भेदांची चौकट आपल्या समाजात अतिशय पक्केपणे उभी आहे. भाषा भेदांच्या बाबतीतही वर्ण व जात हे घटक महत्त्वाचे ठरल्यास नवल नाही. एक म्हणजे स्पृश्य/सवर्ण आणि अस्पृश्य/वर्णहीन या भेदानुसार भाषाभेद भारताच्या सर्वच प्रांतामध्ये आढळतात. तसेच दक्षिण भारतामध्ये (म्हणजे तामिळ, तुळू, कानडी व त्याचबरोबर मराठी या भाषांमध्ये) सवर्णांमध्येही ब्राह्मणी व ब्राह्मणेतर असे भाषा भेदही आढळतात."

ब्राह्मणांच्या सांस्कृतिक-धार्मिक वर्चस्वामुळे बहुतेक ठिकाणी 'ब्राह्मणी बोली' हीच 'प्रमाण बोली' म्हणून प्रस्थापित झालेली आढळते. शिवाय शिक्षण व नागरीकरण यांच्या प्रभावामुळे ब्राह्मणेतर बोली प्रमाण ब्राह्मणी बोलीच्या जवळ येणे ही प्रक्रियाही (निदान मराठी भाषेच्या संदर्भात) सुरू झालेली आढळते.

डॉ. मालशे यांनी आपल्या विवेचनात ब्राह्मणांच्या सांस्कृतिक व धार्मिक वर्चस्वाचा भाषेवर झालेला परिणाम अधोरेखित केलेला आहे. प्रमाण ब्राह्मणी व ब्राह्मणेतर बोली यांच्या जवळ येण्याच्या प्रक्रियेकडेही त्यांनी वाचकांचे लक्ष वेधले आहे. ही प्रक्रिया संस्कृत भाषकांनी प्राकृत भाषकांवर केलेल्या सांस्कृतिक आक्रमणाने सुरू झाली. पिजिन व क्रिऑल या भाषाविषयक संकल्पनांवरून हे अधिक स्पष्ट होते.

भिन्न भाषा बोलणारे समाज परस्परांशी संवाद करायचा प्रयत्न करतात तेव्हा जी संकरित भाषा तयार होते तिला 'पिजिन' या नावाने संबोधले जाते. या भाषा अल्पकालीन असतात; परंतु जेव्हा तिचे क्षेत्र व्यापक होऊन एका संबंध पिढीची ती भाषा बनते तेव्हा तिला 'क्रिऑल' म्हणतात. पिजिन व क्रिऑल या भाषांच्या निर्मितीच्या संदर्भात भाषावैज्ञानिकांनी तीन प्रकारचे सिद्धांत मांडलेले आहेत. १) बालभाषा सिद्धांत २) बहुभाषिक निर्मितीचा सिद्धांत आणि ३) एकभाषिक निर्मितीचा सिद्धांत असे ते तीन सिद्धांत होय. याविषयी माहिती देताना डॉ. मिलिंद मालशे म्हणतात[१] -

"आर्य व द्रविड या संस्कृतीच्या संपर्काच्या प्रारंभीच्या काळात 'पिजिन' भाषा निर्माण होण्यासारखी परिस्थिती होती, असेही मत साउथवर्थ या संशोधकाने मांडले आहे. उच्चवर्णीयांना (विशेषतः ब्राह्मणांना) संस्कृतची 'शुद्धता' टिकवायची होती, पण प्राकृत भाषांमध्ये होणारे बदल रोखण्यात त्यांना रस असण्याचे कारण नव्हते. उत्तर भारतामध्ये द्रविड लोकांवर आपली भाषा (लिखित व औपचारिक तसेच बोली) आर्यांनी लादली असणे शक्य आहे. आर्यांच्या सामर्थ्यामुळे व त्यांच्या सांस्कृतिक प्रभावामुळे स्वतःच्या

भाषेचा द्रविडांना त्याग करावा लागला असावा आणि 'प्राकृत' भाषांवर आधारलेल्या व स्वतःच्या स्थानिक द्रविड भाषांचाही परिणाम असलेल्या पिजिन भाषा निर्माण झाल्या असाव्यात, असा तर्क साउथवर्थने बांधलेला आहे. तेव्हा संस्कृत ही उच्च संस्कृतीची, अत्युच्च सामाजिक वर्गाची व म्हणून सर्वात अधिक प्रतिष्ठा असलेली भाषा; प्राकृत बोली व त्यांच्यातून निर्माण झालेल्या पिजिन बोली या काहीशी कमी प्रतिष्ठा असणाऱ्या आणि मध्यम व निम्न सामाजिक स्तरांत वापरल्या जाणाऱ्या भाषा आणि स्थानिक द्रविड बोली या सर्वात कमी प्रतिष्ठा असणाऱ्या भाषा अशी एकूण श्रेणीव्यवस्था असावी. कालांतराने प्राकृत बोली व पिजिन बोली या इतक्या जवळ असाव्यात आणि इतक्या मोठ्या प्रमाणावर त्यांचा वापर होऊ लागला असावा, की त्यातून 'क्रिऑल' भाषा निर्माण झाल्या असाव्यात. मराठी ही अशीच 'क्रिओलाईझ्' झालेली भाषा होय, असा निष्कर्ष काही पुरावे देऊन साउथवर्थने काढलेला आहे.''

मराठी भाषेच्या निर्मितीस कारणीभूत असे संस्कृतचे आक्रमण आणि स्वतःचे अस्तित्व जपत तत्कालीन मराठी माणसांनी वापरलेली भाषा याचा अंदाज आपणांस वरील विवेचनातून येतो. मराठीचे मूळ असलेली महारठी आणि समकालीन पाली, पैशाची, अर्धमागधी, अपभ्रंश या प्राकृत भाषांमधील शब्द आपणांस मराठी भाषेत आढळतात ते यामुळेच. जे इतर प्राकृतांचे झाले तेच महारठीचे झाले. संस्कृतचा शब्दसंग्रह तिनेही मोठ्या प्रमाणात स्वीकारला. तीच परिस्थिती अव्वल इंग्रजी कालखंडात निर्माण झाली आणि संस्कृतच्या व्याकरणाची सक्ती मराठीवर करण्यात आली. त्यामुळे मराठीने आपले मराठमोळेपण गमावले. तिचे संस्कृतायझेशन मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे तिला ब्राह्मणी मराठी हे नामाभिमान प्राप्त झाले. त्यातून आजची ऱ्हस्व-दीर्घची समस्या निर्माण झाली आहे. तिला नाहीसे करावयाचे असल्याचे ती समजून घेणे आवश्यक आहे.

मराठीची बोलण धाटणी

प्रत्येक भाषेची प्रकृती आणि तिची अभिव्यक्ती वेगळी असते. तिलाच आपण बोलण धाटणी म्हणतो. मराठीची बोलण धाटणी संस्कृतपेक्षा वेगळी आहे. त्याविषयी पुष्पा फडके म्हणतात,[१०]

संस्कृत भाषेचे उच्चारण हे अत्यंत तांत्रिक किंवा कृत्रिम आहे. म्हणूनच ती भाषा बोलायला जड जाते. पण मराठीने मात्र विकसित होताना स्वरयंत्राला पेलेल असे सहज, सोपे, लयबद्ध रूप घेतले आहे. स्थूलमानाने मराठी उच्चारण करताना शब्दाची सुरुवात व्यवस्थित होते, पण मध्य किंवा शेवट होताना तेवढी दक्षता पाळली जात नाही. आजकाल प्रत्येक माणूस घाईत असतो, जणू निवांत स्पष्ट बोलायलाही त्याच्याकडे वेळ असत

नाही. त्यामुळे उच्चारण सोपे व हलके करण्याकडे आजच्या बोलण धाटणीचा कल असतो.

इंग्रजीमध्ये जसे बलाघात (Stress) असे खास उच्चार आहेत, तसे मराठीत नाहीत. इंग्रजीमध्ये खास आघाताने उच्चार केला की अर्थही बदलू शकतो. Water या शब्दात 'वा' वर आघात दिल्यास त्याचा अर्थ पाणी असा नामासारखा होतो. पण उच्चार करताना 'टर' वर भर दिल्यास ते क्रियापद होते. संस्कृतमध्ये ही खास स्वराघात आहेत तसे ते मराठीत नाहीत. संस्कृत भाषेतील जोडाक्षरे ही साघात असतात. मराठीत ती काही प्रमाणात तशी आहेत, शिवाय मराठीत निराघात जोडाक्षरे उच्चारण्याचीही एक लकब विकसित झाली आहे. उदाहरणार्थ : य ची जोडाक्षरे – कायद्याची, सपाट्याने, कोयत्याचा वगैरे. या शब्दांतील जोडाक्षरे निराघात किंवा सपाट उच्चाराची आहेत.

संस्कृत आणि मराठी भाषांची बोलण धाटणी कशी वेगळी आहे हे वरील अवतरणातून दिसून येते; परंतु स्वरांचे ऱ्हस्व–दीर्घत्व संस्कृतप्रमाणे मराठीतही आहे. दीर्घ स्वरांचा उच्चार ऱ्हस्वच्या तुलनेत अधिक सोपा असतो. मराठी भाषा ही सुलभीकरणाकडे वळणारी तसेच नैसर्गिक आहे. त्यामुळे ऱ्हस्व शब्दांपेक्षा दीर्घ स्वरांचे उच्चारण करण्याकडे तिची प्रवृत्ती असते. याविषयी पुष्पा फडके म्हणतात–[११]

"मराठीच्या बोलण धाटणीचे अ चा निभृत उच्चार हे खास वैशिष्ट्य आहे. असा उच्चार मराठीच्या प्रारंभकाळात पारसी भाषेच्या प्रभावामुळे शिरला असावा. नंतरच्या आंग्ल भाषेच्या प्रभावकाळात निभृत अ चा प्रभाव प्रचंड वाढलेला दिसून येतो. विशेषत: शब्दाच्या शेवटचा अंत्य स्वर अ असेल तर तो निभृत किंवा पुसटसा उच्चारला जातो, हे आपण गवत या शब्दाच्या उच्चारावून समजून घेऊ शकतो."

निभृत म्हणजे निष्क्रिय किंवा अदृश्य[१२]. पुसटसा हलका उच्चार असा या शब्दाचा अर्थ याठिकाणी अभिप्रेत आहे. मूळ मराठी शब्दात तो प्रामुख्याने आढळतो. मराठी भाषेत दोन दीर्घ किंवा दोन ऱ्हस्व उच्चार एका पाठोपाठ येण्याचे टाळले जाते. लेखनात असे शब्द आढळत असले तरी प्रत्यक्ष उच्चारात मात्र त्यांचे वजन कमी–जास्त होताना दिसते. याविषयी पुष्पा फडके म्हणतात[१३], "गाढा या शब्दांत दोन्ही दीर्घ अक्षरे (लेखनात) आहेत. पण उच्चारात गा चा किंचित ऱ्हस्व उच्चार होऊन तो ढा या दीर्घ स्वराबरोबर उच्चारला जातो. आ प्रमाणेच ए, ऐ, ओ, औ ह्या दीर्घ स्वरयुक्त शब्दांतही असेच सोयीनुसार ऱ्हस्व किंवा दीर्घ उच्चार करणे, ही मराठीची बोलण धाटणी आहे."

मराठीच्या बोलणधाटणीतील महत्त्वाचे वैशिष्ट्य समजून घेतल्यावर ऱ्हस्व–दीर्घ उच्चारांना मराठी भाषेत फारसे महत्त्व नाही हे दिसून येते. भाषा वैज्ञानिकांनी या मराठीच्या

वैशिष्ट्यांवरून आपला निष्कर्ष मांडला आहे व तो म्हणजे ऱ्हस्व किंवा दीर्घ यापैकी कोणताही स्वर वापरला तरी मराठी भाषेतील शब्दांच्या अर्थामध्ये बदल होत नाही. पुष्पा फडके यांनी याविषयी केलेले स्पष्टीकरण असे–[१४]

"ऱ्हस्व व दीर्घ ही व्याकरणदृष्ट्या स्वनांतरे आहेत. उच्चारात किंवा लेखनात ऱ्हस्व–दीर्घ पाळले नाही म्हणून शब्दाचा अर्थ सहसा बदल नाही. पिळ किंवा पीळ म्हटले तरी अर्थ कळतो. ऱ्हस्व किंवा दीर्घ यामुळे अर्थ बदलत नाही. या क्रियेलाच व्याकरणात अर्थविभेदकता नाही असे म्हणतात. पीळ हा शब्द मूळचाच मराठी आहे. पण मराठीत जे संस्कृत तत्सम शब्द आहेत, त्यामध्ये काही शब्दांत अर्थ विभेदकता आहे हे श्री. अर्जुनवाडकर लक्षात आणून देतात. उदाहरणार्थ : पुर (शहर) पूर (खूप पाणी), सुत (मुलगा) सूत (सारथी). पण असे शब्द थोडे आहेत, आणि तेही संस्कृतच्या व्याकरणाच्या नियमाने चालणारे. त्यांना आपण मराठीच्या नियमात्त्व सामावून घेतले पाहिजे. अशा शब्दांच्या लेखनात किंवा उच्चारात चुका घडल्या तरी संदर्भाने अर्थ व्यवस्थित कळतोच. तेव्हा असे अपवाद सोडून आपण ऱ्हस्व व दीर्घ ह्यामध्ये अर्थविभेदकता नाही असे म्हणू शकतो."

मराठी भाषाविज्ञानात इ व उ ह्यांचे ऱ्हस्व–दीर्घत्व अनुमेय मानले आहे. उदाहरणार्थ, वीट / विटा. येथे स्थानानुसार ऱ्हस्व दीर्घत्व ठरते. म्हणजे त्यासंबंधीचे अनुमान करावे लागते, म्हणून त्याला अनुमेयत्व असे म्हणतात. भाषाशास्त्रात एखादा वर्ण स्वतंत्र मानायचा असेल, तर अननुमेयता व अर्थविभेदकता हे दोन निकष लावले जातात. यातील अननुमेयता म्हणजे बदल न घडणे. हे दोन्ही निकष मराठीत इ–ई आणि उ–ऊ ह्यांना लागत नसल्याने त्यांना स्वतंत्र वर्णन मानता स्वनांतरेच मानणे योग्य ठरते.

मराठीची प्रकृती संस्कृतपेक्षा वेगळी आहे त्यामुळे तिला संस्कृतचे व्याकरण लावणे अनैसर्गिक आहे हे आपल्या लक्षात येण्यास वरील विवेचन पुरेसे आहे. यापूर्वीच्या अनेक अभ्यासकांनी या वास्तवावर प्रकाशझोत टाकला आहे. या साऱ्यांचा परामर्श घेणाऱ्या पुष्पा फडके यांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याचे आवाहन शिक्षण क्षेत्रातील विविध घटकांना केले आहे. त्यामुळे त्यांच्या संशोधनांचा परामर्श प्रामुख्याने या ठिकाणी केलेला आहे.

मराठी भाषेत येणारे इकार आणि उकार यांचे लेखन व उच्चार यात काहीवेळा फरक आढळतो. लेखन ऱ्हस्व तर उच्चार दीर्घ तर बरेचदा याउलट घडताना दिसते. ऱ्हस्व–दीर्घ उच्चारातही आणखी चार प्रकार आढळतात. अर्ध ऱ्हस्व, सामान्य ऱ्हस्व, अति ऱ्हस्व आणि उदासीन तसेच दीर्घ, सामान्य दीर्घ आणि अति दीर्घ आणि प्लुत असे

ते चार प्रकार होत. त्यांच्या लेखनासाठी दोन-दोन स्वतंत्र चिन्हे आहेत. तशी चिन्हे इतर स्वरांसाठी आढळत नाहीत. ते स्वर म्हणजे अ, आ, ए, ऐ, ओ, औ हे होत.

उच्चारानुसारी लेखन हे धोरण मराठी साहित्य महामंडळाने स्वीकारले असले तरी मराठीतील स्वरांचे ऱ्हस्व-दीर्घ स्थिर नाहीत. शब्दातील त्यांच्या स्थानानुसार ते बदलत राहते. यावरून मराठीतील स्वरांचे ऱ्हस्व-दीर्घत्व लेखनात दाखविणे अशक्य होते हे दिसून येते. त्याचप्रमाणे ऱ्हस्व असो वा दीर्घ मराठीच्या वाक्यातील संदर्भानुसार अशा शब्दांचा अर्थ स्पष्ट होतो. संस्कृतप्रमाणे मराठीतील स्वरांच्या ऱ्हस्व-दीर्घनुसार शब्दांच्या अर्थात बदल होत नाही. त्यामुळे ऱ्हस्व-दीर्घाचे स्तोम मराठी भाषेत वाढविण्याचे काही कारण नाही.

इकार-उकार, ऱ्हस्व-दीर्घ कशाला?

संस्कृत भाषेप्रमाणे मराठीमध्ये ऱ्हस्व-दीर्घ उच्चार स्थिर नाहीत असे आधुनिक संशोधकांनी सिद्ध झालेले आहे. मराठीत भाषेत येणाऱ्या शब्दातील स्थानाप्रमाणे ते बदलतात. त्यामुळे या विषयावर अद्ययावत संशोधन करणाऱ्या पुष्पा फडके म्हणतात, "अशा परिस्थितीमुळे खरा प्रश्न निर्माण होतो तो केवळ इकार व उकार यांचे ऱ्हस्व-दीर्घत्व लेखनात दाखवणे आवश्यक आहे का? मराठीच्या लेखनात अर्ध्या-पाऊण चुका या ऱ्हस्व-दीर्घ नीट न कळल्यामुळे होतात. त्यामुळे इकार व उकार हे एकेरीच ठेवावेत का? केवळ लेखन चुका होतात म्हणून असे स्वर गाळून टाकणे, हे वरवर पाहता धोकादायक पाऊल आहे असे समजून अनेकजण या विचाराला विरोध करतील. पण मुळातच मराठीत ऱ्हस्व-दीर्घाच्या लेखनाप्रमाणेच त्या त्या शब्दांचे उच्चार होतात का, हा खरा कळीचा मुद्दा आहे. कारण सगळ्या ऱ्हस्व स्वरांचे वेळप्रसंगी दीर्घ उच्चार तर शब्दातील दीर्घ लेखनाचे ऱ्हस्व उच्चार होतात, असे आपल्याला आढळून येते. मग ऱ्हस्व-दीर्घाच्या दोन-दोन चिन्हांचे अस्तित्व वर्णमालेत कशाला ठेवायचे?"

जुन्या काळचे मराठी लेखन पाहिले तर जुन्या ग्रंथांतून इकाराच्या व उकाराच्या ऱ्हस्व-दीर्घत्वाबद्दल कोणतेच नियम पाळलेले दिसत नाहीत. शिवकालीन मराठी लेखन खूपसे मोडीत होत असे. मोडी लिपीमध्ये मुळातच इकार-उकाराचे ऱ्हस्व-दीर्घत्व नाही. केवळ एकच इकार व उकार आहे. श्री. गोखलेंनी 'मराठी भाषेची लेखन पद्धती' या इ.स. १९०० साली लिहिलेल्या परिपाठमधील उदाहरणे दिली आहेत. त्यामध्ये जुन्या लेखनात केवळ दीर्घ ई व ऊ कसे लिहिले जात होते, हे स्पष्ट केले आहे. त्यातील अधीक, शीर, हरीण, मंदीर, वीष, अंकूर, शकून, गरूड, तरूण, सूग, चतूर, विपूल या शब्दांच्या उदाहरणांकडे पाहिले की हे शब्द मूळचे संस्कृत म्हणजे तत्सम असूनही संस्कृत

लेखन पद्धतीने लिहिले जात होते, असे आढळून येते. याउलट इ.स. १९७२ मध्ये महामंडळाने केलेल्या नियमात यातील विष, गुण यासारख्या तत्सम शब्दांच्या लेखनात संस्कृत पद्धतीचा आग्रह धरल्याचे आपल्याला लक्षात येते.

वरील विवेचनातून इकार–उकारची समस्या संस्कृतच्या अभिनिवेशी आग्रहातून निर्माण झालेली आहे हे स्पष्ट होते. अरविंद मंगरूळकर व ना. गो. कालेलकर या भाषावैज्ञानिकांनी ते गाळावेत असा सल्ला मराठी साहित्य महामंडळाला दिला होता. मो. रा. वाळंबे या मराठीच्या आधुनिक व्याकरणकारांनी मराठी वर्णमालेतून दीर्घ ई आणि ऊ गाळून टाकणे योग्य ठरेल असे आपले मत मांडले होते; परंतु काही विद्वानांनी याविरुद्ध मत मांडल्यामुळे आजही शुद्धलेखनाचे नियम म्हणून त्यांनी महत्त्वाचे स्थान आहे. हे नियम प्रस्थापित होण्यापूर्वी डॉ. वि. भि. कोलते यांनी त्याविरुद्ध मोठी मोहीम उघडली होती.

याविषयी आपली भूमिका मांडताना डॉ. कोलते यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांनी सुरू केलेल्या भाषाशुद्धीच्या चळवळीविषयी आपला विरोध व्यक्त केला आहे. तिचा विरोध करण्याकरिता त्यांनी 'सोडचिठ्ठी' हे नाटक लिहिले होते. अनुच्चारित अनुस्वारांना त्यांनी १९४४ साली संपादन केलेल्या गोविंदप्रभूचरित्र या ग्रंथाच्या प्रस्तावनेत अर्धचंद्र दिला होता. आपले लेखन प्रकाशित करताना संपादकांनी आपल्या लेखनाबर हुकूम ते छापावे अशी अट त्यांनी घातली होती. त्यांच्या या प्रमेयाचा स्वीकार प्रा. ना. सी. फडके यांनी 'अंजली' मासिकात केला होता. महाराष्ट्र साहित्य परिषदेने या प्रमेयाला रीतसर मान्यता द्यावी अशी विनंती त्यांनी केली; परंतु तसे न झाल्यामुळे विदर्भ साहित्य संघाद्वारे नवीन नियम तयार करून त्यांनी ते शासनापुढे सादर केलेत; परंतु साहित्य महामंडळाने ते स्वीकारलेत असा संदेश जावा याकरिता ते मराठी साहित्य महामंडळाचे नियम म्हणून प्रसारित केले गेले. ही माहिती देऊन डॉ. वि. भि. कोलते म्हणतात–[१६]

"मी पाहिलेले एक स्वप्न साकार झालेले पाहून मनाला फार समाधान वाटते. शुद्धलेखनाच्या बाबतीत ऱ्हस्व–दीर्घचा प्रश्न अजूनही शिल्लक आहे. भोपाळ येथील मराठी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून मी तो १९६७ साली मांडला. मराठी साहित्य महामंडळाच्या नियमांच्या कक्षेत राहून तो कसा सोडवता येईल या विचाराने सध्या माझे लक्ष वेधले आहे."

डॉ. कोलते यांनी जळगाव येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनातही ऱ्हस्व–दीर्घ विषयीच्या समस्येकडे सर्वांचे लक्ष वेधले; परंतु त्याकडे कुणी फारसे गांभीर्याने पाहिले नाही. "मराठीत ई–ऊ कृत्रिम असल्याने काढून टाकले पाहिजेत. कारण त्यामुळे आशयात

कोणताही फरक पडत नाही." या आपल्या १९६७ मधल्या विधानांचा पुनरूच्चार त्यांनी यावेळी केला होता. अनुच्चारित अनुस्वाराविषयी बेफिकिरी दाखविणाऱ्या पुणेरी विद्वानांनी ऱ्हस्व-दीर्घच्या समस्येकडेही डोळेझाक केली. परिणामी मराठी लिहिणाऱ्या प्रत्येकाच्या मनात या समस्येने दहशत निर्माण केली. अशा स्थितीत मराठीच्या विकासाच्या वांझोट्या चर्चा करण्यात काय अर्थ आहे ? ज्यांनी डॉ. कोलते यांच्या कळकळीला वाटाण्याच्या अक्षता लावल्या त्यांनी किमान पुष्पा फडके यांच्या विवेचनाकडे तरी गांभीर्याने पाहावे. त्या म्हणतात-[१७]

"...लिपीतील इकाराची व उकाराची दोन-दोन चिन्हे गाळून टाकावीत. लेखन सुकरतेसाठी इकार हा केवळ ई किंवा खरं म्हणजे ओकार असा तर उकार हा अुकार असा आणि (ी,ु) या खुणांनी लिहावा. अर्थातच त्याला जुन्या नावाने दीर्घ ई किंवा ऱ्हस्व उ असे म्हणायचे नाही. त्यामुळे ऱ्हस्व, दीर्घ इकार-उकाराच्या शेकडो चुकांच्या आपोआप बंदोबस्त होईल आणि आजच्या भाषेत बोलायचे तर मराठी लेखनामधील टेन्शनच नाहीसे होईल."

वरील विवेचन विविध स्तरावरील अद्ययावत संशोधनांच्या द्वारे केलेले आहे. त्यासाठी १९६७ पासून डॉ. वि. भि. कोलते यांनी जशी मोहीम उघडली तशी कुणीही उघडली नाही.

समारोप व निष्कर्ष

तथाकथित शुद्धलेखनाचे नियम पुणेरी ब्राह्मणांच्या बोलीवरून बनविले गेले आहेत. संस्कृत भाषा ही त्यांची धर्मभाषा असल्यामुळे तिलाच प्रमाण मानून जसा यापूर्वी त्यांनी अनुच्चारित अनुस्वाराविषयी ठाम निर्णय घेतला नाही, तसाच ते ऱ्हस्व-दीर्घविषयीही घेणार नाहीत. त्यामुळे मराठी भाषेचा विकास तसेच संवर्धन करण्याची तळमळ असणाऱ्यांनी आता याकामी पुढाकार घ्यायला हवा. एकीकडे मराठीची चिंता वाटण्याचे नाटक करायचे आणि दुसरीकडे तिचे मरण उघड्या डोळ्यांनी पाहायचे, असा दुटप्पीपणा आता परवडणार नाही. कारण की जागतिकीकरणाच्या रेट्यात इंग्रजी हीच ज्ञानभाषा होणार आहे, यात शंका नाही. एकीकडे तिचे वर्चस्व वाढू द्यायचे आणि दुसरीकडे आपल्याच भाषाबांधवावर अन्याय करून त्यांना मराठी बोलण्यापासून वंचित करायचे. असा क्रूरपणा करणारे मराठीचे तारक नसून मारक आहेत हे यावरून स्पष्ट होते. म्हणून आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे भाषाअभ्यासकांनी मराठीच्या क्षीण अवस्थेचे निदान करावे. त्याचप्रमाणे त्यावर उपाययोजना करण्याचा एक टप्पा म्हणून मराठीतील ऱ्हस्व-दीर्घची समस्या सोडवावी. अन्यथा मराठीच्या मानगुटीवर कसून वेटोळे घातलेली

संस्कृतची वेलांटी तिचा प्राण घेतल्याशिवाय राहणार नाही. ही एक धोक्याची सूचना आहे.

संदर्भ :-

१. वसंत आबाजी डहाके, जागतिकीकरण–मराठी भाषा व साहित्य सद्यस्थिती आणि भवितव्य (बीजभाषण) आमची श्रीवाणी, वर्ष १६, अंक १, ऑक्टोबर २००८ ते जानेवारी २००९ धुळे, पृ. १४

२. शुद्धलेखन नियमावली, भाषा संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, पुनर्मुद्रण १९९६, उपोद्घात व पृ. ४, ५

३. सुहासिनी लद्दू, मराठीच्या प्रमाणभाषेचे स्वरूप, म. रा. वि. ग्र. नि. मंडळासाठी कान्टिनेन्टल प्रकाशन, पुणे १९८३ पृ. १३

४. ना. गो. कालेलकर, भाषा आणि संस्कृती, मौज प्रकाशनगृह, मुंबई, १९७२, पृ. ६६

५. म. अ. मेहेंदळे मराठी विश्वकोश–१८, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, २००९ पृ. ५१८

६. ना. गो. कालेलकर, मराठी विश्वकोश :१, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७६, पृ. ६२१

७. प्र. रा. देशमुख, सिंधुसंस्कृती, ऋग्वेद व हिंदू संस्कृती, प्राज्ञ पाठशाळा मंडळ, वाई, १९६६ पृ. ३१३

८. मिलिंद स. मालशे, आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन, लोकवाङ्मय गृह व मराठी भाषा विकास परिषद, मुंबई, पृ. १६०–६१

९. कित्ता, पृ. १६१

१०. पुष्पा फडके, मराठीसाठी लोकनागरी, पद्मगंगा प्रकाशन, पुणे, २०१२, पृ. २८०

११. कित्ता, पृ. २८१

१२. गीर्वाणलघुकोश, ज. वि. ओक, जमशेदपूर, बिहार, १९६० पृ. २६६

१३. पुष्पा फडके, पूर्वोक्त, पृ. २८३

१४. कित्ता, पृ. २८३

१५. कित्ता, पृ. २८८

१६. वि. भि. कोलते, एका पिढीचे आत्मकथन (स. पु. शि. रेगे) मुंबई, मराठी साहित्य संघ प्रकाशन, मुंबई, दु.आ. २००७, पृ. १४२

१७ पुष्पा फडके, पूर्वोक्त, पृ. ३२४

□□□